सोमवार दि. २९ जुन २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २९८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## वाहतूक कोंडी की प्रशासनाचा नियोजन शून्य कारभार? जालना शहर विकासाच्या नावाखाली वेठीस

### रस्ते खोदले, पूल बंद झाले, पर्यायी मार्गच नाहीत; सर्वसामान्य जालनाकरांचा रोजचा संघर्ष

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहर आज एका विचित्र परिस्थितीतून जात आहे. शहरात विकासकामे सुरू आहेत, नवीन पूल उभारले जात आहेत, उड्डाणपुलांची दुरुस्ती होत आहे, रस्ते खोदले जात आहेत; मात्र या विकासकामांचे नियोजन आणि समन्वय पूर्णपणे कोलमडल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. परिणामी जालनाकर नागरिकांना दररोज वाहतूक कोंडी, वेळेचा अपव्यय, आर्थिक नुकसान आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. विकासकामे कोणत्याही शहरासाठी आवश्यक असतात. मात्र विकासकामे सुरू करण्यापूर्वी पर्यायी व्यवस्था उभारणे, वाहतूक आराखडा तयार करणे आणि नागरिकांना पूर्वसूचना देणे ही प्रशासनाची मूलभूत जबाबदारी असते. जालना शहरात याच गोष्टींचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे. **अनेक कामे एकाचवेळी; समन्वयाचा अभाव**

अंबड चौफुली ते मंठा चौफुली उड्डाणपुलाची दुरुस्ती सुरू असताना दुसरीकडे कुंडलिका नदीवरील नवीन पुलाचे काम सुरू करण्यात आले. त्याचवेळी शहरातील अनेक भागांत रस्ते खोदाई सुरू झाली. या सर्व कामांचे वेळापत्रक आणि वाहतूक व्यवस्थापन यामध्ये कोणताही समन्वय दिसून आला नाही. परिणामी शहरातील प्रमुख वाहतूक मार्गांवर प्रचंड दबाव निर्माण झाला असून पर्यायी रस्त्यांवरही वाहनांच्या रांगा लागण्याचे प्रमाण वाढले आहे.

कुंडलिका नदीवरील पुलाच्या कामासाठी तयार करण्यात आलेला तात्पुरता वळण रस्ता पहिल्याच पावसात वाहून जाणे ही केवळ तांत्रिक चूक नसून नियोजनातील गंभीर त्रुटी मानली जात आहे. लाखो रुपयांचा खर्च करून उभारलेली व्यवस्था काही तासांच्या पावसात निकामी होत असेल तर कामाच्या गुणवत्तेबाबत आणि तांत्रिक तपासणीबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

शहरातील नागरिकांमध्ये यामुळे सार्वजनिक निधीच्या वापराबाबत नाराजी वाढताना दिसत आहे.

वाहतूक कोंडी ही केवळ वाहनांच्या रांगा नसतात. त्याचा थेट परिणाम शहराच्या अर्थकारणावर होत असतो. व्यापारी वर्गाला उशिरा माल पोहोचतो, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते, कर्मचाऱ्यांना कार्यालयात उशीर होतो आणि इंधनाचा अतिरिक्त खर्च नागरिकांच्या खिशावर पडतो. दिवसभरात हजारो वाहनांचे अतिरिक्त इंधन जळत असल्याने पर्यावरणीय प्रदूषणही वाढत आहे.

शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक नियंत्रणासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याची तक्रार वारंवार केली जात आहे. *(पान २ वर)*

## चंदनझिऱ्यातील सत्यम नगरच्या महिलांनी नगरसेवकांसमोर मांडला समस्यांचा पाढा

### रस्त्यांवर साचणारे पाणी, विजेचा लपंडाव आणि चोरट्यांची दहशत; प्रभागातील चारही नगरसेवकांकडून प्रश्न सोडवण्याचे आश्वासन

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील चंदनझिरा परिसरातील सत्यम नगर भागातील महिलांनी रविवारी प्रभागातील नगरसेवकांसमोर आपल्या दैनंदिन समस्यांचा पाढा वाचत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. पावसाचे साचणारे पाणी, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा आणि परिसरात वाढलेली चोरट्यांची दहशत यामुळे नागरिक त्रस्त झाले असून महिलांनी एकत्र येत आपल्या समस्या लोकप्रतिनिधींसमोर मांडल्या.

या वेळी प्रभागातील नगरसेवक अनिल तिरुखे, सुनील बोर्डे, माजेद पठाण आणि दिनेश दैने यांनी परिसराची पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला. महिलांनी मांडलेल्या अडचणी ऐकून घेत संबंधित प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन नगरसेवकांनी दिले.



सत्यम नगर परिसरात पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याची तक्रार महिलांनी केली. नाल्यांची अपुरी व्यवस्था आणि पाण्याचा प्रवाह अडथळला जात असल्याने रस्त्यांवर तळ्यासारखी *(पान २ वर)*

## प्रशासनाच्या नियोजन शून्य कारभारामुळे जालना शहरात प्रचंड वाहतूक कोंडी; जनतेला होणारा मनस्ताप तात्काळ दूर करा - भास्करराव अंबेकर

### *उड्डाणपूल दुरुस्ती, पुलांचे बांधकाम, रस्ते खोदाई आणि वाहतूक नियोजनाचा अभाव; नागरिकांचे हाल, प्रशासनावर तीव्र टीका*

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेल्या तीव्र वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे ही परिस्थिती उद्भवल्याचा आरोप माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केला आहे. तातडीने प्रभावी वाहतूक नियोजन करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

अंबड चौफुली ते मंठा चौफुली या शहरातील महत्त्वाच्या मार्गावरील उड्डाणपुलाच्या दुरुस्तीचे काम सध्या सुरू आहे. याचबरोबर कुंडलिका नदीवरील रोहणवाडी रस्त्यावर नवीन पुलाचे बांधकाम सुरू असल्यामुळे हा मुख्य मार्ग बंद करण्यात आला आहे. परिणामी शहरातील संपूर्ण वाहतूक पर्यायी रस्त्यांवर वळविण्यात आली असली तरी त्यासाठी कोणतेही प्रभावी नियोजन करण्यात आले

नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. पहिल्याच पावसात वळण रस्ता वाहून नदीवरील पुलाच्या बांधकामासाठी प्रशासनाने लाखो रुपये खर्च करून तात्पुरता वळण रस्ता तयार केला होता. मात्र, पहिल्याच पावसात हा रस्ता वाहून गेल्याने प्रशासनाच्या कामकाजावर आणि नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून सार्वजनिक निधीच्या वापराबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शहरातील अनेक भागांमध्ये वाहतूक कोलमडली काद्राबाद, बडी सडक, हनुमान घाट, मुर्गी तलाव परिसर तसेच झेंडा चौक परिसरात *(पान २ वर)*

## महाराष्ट्रातील विद्यार्थिनीची जर्मन मॅथ ऑलिम्पियाड २०२७ च्या ग्रँड फायनलसाठी निवड

### पूजा वायळ हिने जर्मन मॅथ ऑलिम्पियाड २०२६ मध्ये यश मिळवत जर्मनीतील ग्रँड फायनलमध्ये स्थान पटकावले

**जालना -प्रतिनिधी**

महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब ठरत, जालना जिल्ह्यातील पूजा वायळ हिने जर्मन मॅथ ऑलिम्पियाड २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत मे २०२७ मध्ये जर्मनी येथे होणाऱ्या ग्रँड फायनलसाठी पात्रता मिळवली आहे.जगातील प्रतिष्ठित गणित स्पर्धांपैकी एक मानल्या जाणाऱ्या जर्मन मॅथ ऑलिम्पियाडमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत पूजाने भारताचे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळवली आहे. तिचे हे यश



तिची असामान्य गणिती क्षमता, कठोर परिश्रम, सातत्य आणि जिद्द यांचे द्योतक आहे.

पूजा वायळच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, जर्मनीतील अंतिम फेरीत ती भारताचे प्रतिनिधित्व करत देशाचे आणि महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पूजाच्या या यशामुळे जालना जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आनंदाचे वातावरण असून, विद्यार्थ्यांसाठी ती प्रेरणादायी ठरत आहे. तिच्या पुढील वाटचालीसाठी विविध स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## पल्स पोलिओ मोहिम शुभारंभ

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिका, आरोग्य विभागाच्या वतीने राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा शुभारंभ आज प्रभागातील शिवनेरी नगर येथील डबलजीन आरोग्य केंद्र येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सदर मोहिमेचा शुभारंभ सौ संध्या संजय देठे, सभापती, महिला व बालकल्याण समिती, जालना शहर महानगरपालिका* यांच्या शुभहस्ते बालकांना पोलिओ डोस पाजून करण्यात आले. याप्रसंगी बोलताना सभापती सौ संध्या देठे म्हणाल्या, ‘‘दोन थेंब प्रत्येक वेळी, पोलिओवर विजय दरवेळी‘‘ हा संदेश घेऊन आपण प्रत्येक घरापर्यंत पोहोचणार आहोत. ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक पोलिओ डोसपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. पोलिओला



कायमचे हद्दपार करण्यासाठी पालकांनी पुढे येऊन आपल्या बाळाला पोलिओचा डोस द्यावा व आपल्या परिसरातील इतर बालकांनाही लस देण्यास सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

सदरची पल्स पोलिओ मोहीम शहरातील सर्व आरोग्य केंद्र, अंगणवाडी केंद्र व बूथ स्तरावर पुढील काही दिवस राबविण्यात येणार असून, आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन बालकांना डोस देतील. १.दर्गा शरीफ अंगणवाडी, निरामय हॉस्पिटल,स्टेशन रोड, स्वामी समर्थ केंद्र,भालेनगरी, समर्थ हॉस्पिटल समोरच,चंद्रकला निवास,सुभद्रा नगर, स्वामी समर्थ केंद्र,नरिमान नगर, अरविंद चव्हाण सर यांचे घर,सोनल नगर, आयुष्यमान आरोग्य मंदिर,डबलजीन, या ठिकाणी सुद्धा उपलब्ध आहेत.

जालना शहरातील व प्रभागातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या परिसरातील ० ते ५ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना नजीकच्या केंद्रावर नेऊन पोलिओचा डोस द्यावा व या राष्ट्रीय मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून मोहीम यशस्वी करावी.

**अधिक माहितीसाठी आपल्या भागातील आशा ताई, ए.एन.एम. किंवा अंगणवाडी कार्यकर्तीशी संपर्क साधावा, ही विनंती. महिला बालकल्याण समिती जालना शहर महानगरपालिका जिल्हाध्यक्ष भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा जिल्हा जालना**

**सौ संध्या संजय देठे**
**सभापती**

### *जालन्यात दहशतवाद विरोधी शाखेची मोठी कारवाई*

## नशेच्या ‘बटन गोळ्या’ जप्त, औषध विक्रीच्या रॅकेटचा पर्दाफाश

### संघर्ष हॉटेल परिसरातून एक आरोपी ताब्यात; मेडिकल चालकासह दोघांविरुद्ध एनडीपीएस व औषध कायद्यान्वये गुन्हा दाखल, ₹२२ हजारांहून अधिक मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात नशेसाठी वापरण्यात येणाऱ्या ‘बटन गोळ्या’च्या अवैध विक्रीविरोधात दहशतवाद विरोधी शाखेने मोठी कारवाई करत तब्बल १०८० गोळ्या जप्त केल्या आहेत. या कारवाईमुळे शहरात सुरू असलेल्या नशेच्या औषधांच्या अवैध पुरवठ्याचे मोठे रॅकेट उघडकीस आले असून दोन आरोपींविरुद्ध विविध कायद्यांअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू आणि अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी अवैधपणे नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांची विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दहशतवाद विरोधी शाखेने गुप्त माहितीच्या आधारे जालना शहरातील विशाल कॉर्नर परिसरातील संघर्ष हॉटेलसमोर सापळा रचला. कारवाईदरम्यान पोलिसांनी संशयित इसमाला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव शेख अफसर शेख अन्वर (वय २७, रा. दुःखीनगर, जुना जालना) असे सांगितले. त्याच्याकडून नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या ‘अँझिलम ०.५’ ( ०.५ ) या गोळ्या जप्त करण्यात आल्या.

**मेडिकल चालकाकडून गोळ्यांचा पुरवठा**

प्राथमिक चौकशीत शेख अफसर याने या गोळ्या विशाल शंकरआप्पा मिटकरी (वय ४८) यांच्याकडून घेतल्याची कबुली दिली. विशाल मिटकरी हे काद्राबाद



परिसरातील पाणीवेस रोडवरील वसंत मेडिकलशी संबंधित असल्याचे तपासात समोर आले. त्यानंतर पोलिसांनी पुढील कारवाई करत संबंधितांकडून मोठ्या प्रमाणात बटन गोळ्यांचा साठा जप्त केला.

**१०८० गोळ्यांसह मोबाईल जप्त**

कारवाईदरम्यान पोलिसांनी एकूण १०८० बटन गोळ्या जप्त केल्या. यामध्ये १६ स्ट्रिपमधील २४० गोळ्या आणि ७६ स्ट्रिपमधील ८४० गोळ्यांचा समावेश आहे. तसेच दोन विवो कंपनीचे मोबाईल फोनही जप्त करण्यात आले.

**जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये:**

२४० गोळ्या किंमत ₹७५३
८४० गोळ्या किंमत ₹३,५८०
विवो कंपनीचे दोन मोबाईल फोन किंमत ₹१८,००० असा एकूण ₹२२,३३३ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**विविध कायद्यांअंतर्गत गुन्हा दाखल**

या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३४५/२०२६ नोंद करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता () कलम १२३ व २७८ तसेच एनडीपीएस कायदा १९८५ मधील कलम ८(सी), २२(अ) आणि औषधी व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४० मधील कलम १८(अ), १८(क), २७(ब)() अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

**संयुक्त पथकाची धडक कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. दहशतवाद विरोधी शाखेचे प्रभारी अधिकारी *(पान २ वर)*

# संपादकीय....

## गावठी कट्टा जप्त झाला; पण भीतीचे मूळ संपले का?

जालना शहरातील गांधीनगर परिसरातून विनापरवाना गावठी कट्ट्यासह एका संशयिताला अटक करून सदर बाजार पोलिसांनी केलेली कारवाई निश्चितच कौतुकास्पद आहे. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने सापळा रचत आरोपीला जेरबंद केले आणि संभाव्य गंभीर गुन्हा घडण्यापूर्वीच तो रोखला. मात्र या घटनेने एक गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहेशहरात बेकायदा शस्त्रे येतात कुठून आणि ती कोणाच्या संरक्षणाखाली फिरतात?

एका व्यक्तीकडे गावठी कट्टा सापडणे ही केवळ एक स्वतंत्र घटना म्हणून पाहता येणार नाही. गेल्या काही वर्षांत राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये बेकायदा शस्त्रांच्या जप्तीच्या घटना वाढताना दिसत आहेत. जालना जिल्ह्यातही वेळोवेळी गावठी कट्टे, तलवारी, चाकू आणि अन्य शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. त्यामुळे ही समस्या केवळ कायद्याची नसून सामाजिक आणि गुन्हेगारी व्यवस्थेशी संबंधित आहे.

गावठी कट्टा हा अनेकदा दहशत निर्माण करणे, खंडणी, वैयक्तिक वाद, टोळी संघर्ष किंवा इतर गंभीर गुन्ह्यांमध्ये वापरला जातो. अशा शस्त्रांचा वापर होण्यापूर्वीच त्यांची जप्ती होणे ही पोलिसांसाठी मोठी उपलब्धी आहे. सदर बाजार पोलिसांनी केलेली कारवाई याच दृष्टीने महत्त्वाची ठरते.

मात्र प्रत्येक जप्तीमागे काही मूलभूत प्रश्न उभे राहतात. संबंधित आरोपीपर्यंत हे शस्त्र कसे पोहोचले? त्याचा पुरवठादार कोण आहे? त्यामागे एखादे जाळे कार्यरत आहे का? केवळ शस्त्र जप्त करून प्रकरण संपविण्याऐवजी त्या साखळीपर्यंत पोहोचणे अधिक आवश्यक आहे.

शहरातील वाढती गुन्हेगारी, युवकांमधील वाढती आक्रमकता, सामाजिक तणाव आणि गुन्हेगारी प्रवृत्ती यामुळे बेकायदा शस्त्रांची मागणी वाढत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसते. बेरोजगारी, स्थानिक वाद, आर्थिक स्पर्धा आणि गुन्हेगारी टोळ्यांचा प्रभाव यांचाही या समस्येशी संबंध असू शकतो.

दुसरीकडे पोलिसांनी वाढवलेली गस्त, गुप्त माहिती यंत्रणा आणि प्रतिबंधात्मक कारवाया यामुळे अनेक गुन्हे रोखले जात आहेत. गोपनीय माहितीच्या आधारे झालेली ही कारवाई पोलिसांच्या दक्षतेचे उदाहरण आहे. मात्र कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी केवळ पोलिसांचीच नसून समाजाचीही आहे. संशयास्पद हालचाली, बेकायदा शस्त्रे किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीची माहिती नागरिकांनी पोलिसांना दिल्यास अशा कारवायांना अधिक बळ मिळू शकते. अनेक वेळा भीती, दबाव किंवा उदासीनतेमुळे नागरिक माहिती देण्यास टाळाटाळ करतात. ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. जालना शहरात गावठी कट्ट्यासह आरोपी अटकेत असणे ही पोलिसांची कामगिरी आहे; मात्र या घटनेमुळे समाजानेही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. कारण शस्त्र हातात येण्यापूर्वी गुन्हेगारी मनात जन्म घेते आणि त्या मानसिकतेवर नियंत्रण मिळविणे हे समाज, प्रशासन आणि नागरिक यांचे सामूहिक कर्तव्य आहे.

## ऐन खरीपाच्या तोंडावर बैलजोडी चोरी; भेंडाळ्यातील शेतकऱ्यावर आर्थिक संकट

### गोठ्यातून बैलजोडी लंपास; उद्धव सुरासे यांच्यासमोर शेतीची कामे रखडण्याचा धोका

**घनसावंगी/भेंडाळा । प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील भेंडाळा येथे ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्याची बैलजोडी अज्ञात चोरट्यांनी गोठ्यातून चोरून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले असून परिसरातील शेतकरी वर्गात भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. भेंडाळा येथील शेतकरी उद्धव सर्जेराव सुरासे यांनी नेहमीप्रमाणे आपल्या शेतातील कामे आटोपल्यानंतर रात्री बैलजोडी गोठ्यात बांधली होती. मात्र, दुसऱ्या दिवशी सकाळी शेतीच्या मशागतीसाठी ते गोठ्यात गेले असता दोन्ही बैल जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. गोठ्याजवळील परिस्थिती पाहता अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत नियोजनबद्ध पद्धतीने बैलजोडी चोरून नेल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीय, नातेवाईक आणि ग्रामस्थांनी परिसरातील शेते, रस्ते, नदीकाठ तसेच शेजारील गावांमध्ये बैलांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. अनेक ठिकाणी चौकशी करूनही बैलांचा कोणताही मागमूस लागला नसल्याने शेतकरी कुटुंबाची चिंता अधिकच वाढली आहे. सध्या खरीप हंगामाची सुरुवात झाली



असून शेतीच्या मशागतीची आणि पेरणीपूर्व तयारीची कामे वेगाने सुरू आहेत. अशा परिस्थितीत बैलजोडी चोरीला गेल्यामुळे उद्धव सुरासे यांच्यासमोर शेतीची कामे वेळेत पूर्ण करण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतकरी आजही नांगरणी, मशागत आणि इतर शेतीच्या कामांसाठी बैलांवरच अवलंबून असल्याने या घटनेने शेतकरी वर्गात अस्वस्थता निर्माण झाली आहे. जनावरे ही शेतकऱ्यांची खरी संपत्ती मानली जातात. अनेक वर्षांच्या कष्टातून आणि मोठ्या आर्थिक गुंतवणुकीतून शेतकरी बैलजोडी खरेदी करतात. त्यामुळे जनावरे चोरीला जाणे म्हणजे शेतकऱ्याच्या उपजीविकेवरच घाला असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, संशयित हालचाली आणि इतर बाबींची तपासणी सुरू केली आहे. गावकऱ्यांनी सांगितले की, परिसरात यापूर्वीही जनावरे चोरीच्या काही घटना घडल्याची चर्चा आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी पोलीस गस्त वाढविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. तसेच गावपातळीवरही दक्षता समित्या स्थापन करून शेतकरी आणि नागरिकांनी सावध राहण्याची गरज व्यक्त केली जात आहे.



जालना मतदार संघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांची महाराष्ट्र विधान मंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या तालिका अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतांना, अमरदीप शिंदे,विलास भालेकर, राजेक कुरेशी, जानुभाई कुरेशी,पांडुरंग शिंदे,कनीसे बंधु, ओम काशटे व पदाधिकारी दिसत आहे.

## ब्राह्मण सभेच्या अध्यक्षपदी रमेश देहेडकर तर सचिवपदी राजेश आर जोशी यांची बिनविरोध निवड

**जालना - प्रतिनिधी**




जालना ब्राह्मण सभा जालना या संस्थेचे अध्यक्ष कल्याणराव देशपांडे व सचिव संतोष देशपांडे यांनी राजीनामे दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेची निवडणूक होऊन अध्यक्ष म्हणून रमेश देहेडकर व सचिव म्हणून राजेश आर जोशी यांची सचिव म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी पीठासन अधिकारी म्हणून इंजिनियर एस. एन.कुलकर्णी यांनी काम पाहिले तर सहाय्यक म्हणून इंजिनियर सुनील जोशी यांनी काम पाहिले. यावेळी कल्याणराव देशपांडे,डॉ.सुभाष भाले, अँड.चंद्रशेखर देशपांडे, अँड बळवंत नाईक,प्रा.एस.व्ही.देशपांडे, प्राचार्य.गणेश अग्निहोत्री,अभय कुलकर्णी, अँड.संजय देशपांडे, संदीप बदनापूरकर, यशवंत बदनापूरकर, श्रीकांत शेलगावकर, वसंत देहेडकर,चौबे (), डॉ.संजय रुईखेडकर, ए.एम.देशपांडे, सूर्यकांत शिवनगिरीकर, भास्करराव डोणगावकर,रवींद्र देशपांडे,भारती नाईक,डॉ.पौर्णिमा रुईखेडकर,अलका हयातनगरकर, डॉ.चारुस्मिता हवालदार, डॉ.चारुदत्त हवालदार, डॉ.रवींद्र देशमुख, रसना देहेडकर, शोभाताई देशपांडे, सुनंदा बदनापूरकर,सुखदा देशपांडे,पवन कुलकर्णी, रवि जोशी आदी मोठ्यासंखेने ब्राह्मण सभा सदस्य उपस्थित होते.

## जडगाव येथे राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला उत्साहात सुरुवात

### ग्रामपंचायत सदस्य राधाकिसन भोसले यांच्या हस्ते बालकांना पोलिओचे दोन थेंब; पाच वर्षांखालील बालकांच्या लसीकरणावर भर

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण दिवसानिमित्त छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील जडगाव येथे रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेला प्रारंभ करण्यात आला. जडगाव ग्रामपंचायत अंतर्गत अंगणवाडी क्रमांक २ येथे आयोजित कार्यक्रमात पाच वर्षांखालील बालकांना पोलिओचे दोन थेंब देऊन मोहिमेची सुरुवात करण्यात आली.

या मोहिमेचे उद्घाटन ग्रामपंचायत सदस्य राधाकिसन भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी दानिश सलमान शेख व महेविश सलमान शेख या बालकांना पोलिओचे डोस पाजून मोहिमेचा शुभारंभ केला. यावेळी गावातील सरपंच, ग्रामस्थ, प्रतिष्ठित नागरिक, आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी तसेच अंगणवाडी व आशा सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी पालकांना आपल्या पाच वर्षांखालील सर्व बालकांना पोलिओचे डोस देण्याचे आवाहन केले. पोलिओसारख्या गंभीर आजारापासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी लसीकरण अत्यंत आवश्यक असून एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, असा संदेश यावेळी देण्यात आला. या प्रसंगी कडुबा भोसले, गफूर शेख, अनिल निसर्गन यांच्यासह गावातील अनेक नागरिकांनी उपस्थित राहून मोहिमेला पाठिंबा दर्शविला. अंगणवाडी सेविका योगिता भोसले आणि आशा वर्कर अयोध्या वाघ यांनी बालकांना पोलिओचे डोस देण्याची जबाबदारी पार पाडली. त्यांनी पालकांना लसीकरणाचे महत्त्व समजावून सांगत नियमित आरोग्य तपासणी व लसीकरणाबाबत जनजागृतीही केली. आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या या मोहिमेमुळे ग्रामीण भागातील बालकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यास मोठी मदत होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. गावातील सर्व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोहिमेच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत जडगाव परिसरातील सर्व पाच वर्षांखालील बालकांना पोलिओचे डोस देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, यासाठी आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर आणि अंगणवाडी सेविका घरोघरी जाऊनही जनजागृती करणार आहेत. बालकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि पोलिओमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी ही मोहीम महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले.



## पान १ व ४ वरुन...

### वाहतूक कोंडी की...

काही चौकांमध्ये सिग्नल व्यवस्था अपुरी आहे तर काही ठिकाणी वाहतूक पोलीस दिसत नाहीत.

प्रशासन, महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वाहतूक विभाग यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याने समस्या अधिक गंभीर होत आहे. नाल्यांवरील तुटलेले ढापे, अर्धवट रस्ते, खोदलेले भाग आणि पावसाळ्यात साचणारे पाणी यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. दुचाकीस्वार, विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे.

विकासकामांच्या ठिकाणी सुरक्षेचे फलक, बॅरिकेड्स आणि योग्य प्रकाशव्यवस्था नसल्याने अनेक ठिकाणी जीवितहानीची शक्यता नाकारता येत नाही. जालना शहराला विकासाची आवश्यकता आहे, याबाबत कोणाचेही दुमत असू शकत नाही. मात्र विकासकामे आणि नियोजन यांचा समतोल राखणे तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ कामे सुरू करणे म्हणजे विकास होत नाही; तर ती कामे नागरिकांना कमीत कमी त्रास होईल अशा पद्धतीने पूर्ण करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

आज जालनाकरांचा प्रश्न विकासकामांना विरोध करण्याचा नाही, तर नियोजनाच्या अभावामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा आहे. जालना शहरातील वाहतूक कोंडी ही केवळ तात्पुरती गैरसोय नसून प्रशासनातील नियोजनशून्यतेचे गंभीर उदाहरण ठरत आहे. विकासकामे आवश्यक आहेत; मात्र त्यांचे नियोजन, समन्वय आणि अंमलबजावणी यामध्ये सुधारणा झाली नाही तर भविष्यात शहराला आणखी मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते. जालनाकर नागरिकांना विकास हवा आहे; पण तो त्रासमुक्त, नियोजनबद्ध आणि जबाबदार प्रशासनासह हवा आहे. आता प्रशासनाने केवळ कामे करण्यापेक्षा ती योग्य पद्धतीने पूर्ण करण्यावर भर देण्याची वेळ आली आहे.

### चंदनझिऱ्यातील...

परिस्थिती निर्माण होत आहे. रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अनेक ठिकाणी चिखल आणि घाण साचल्याने अपघाताचा धोकाही वाढला आहे. महिलांनी सांगितले की, पावसाचे पाणी अनेक दिवस साचून राहत असल्याने डासांची उत्पत्ती वाढण्याची शक्यता असून डेंग्यू, मलेरिया आणि इतर साथीच्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे तातडीने जलनिस्सारणाची व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली. परिसरातील दुसरी गंभीर समस्या म्हणजे वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा. महिलांनी नगरसेवकांच्या निदर्शनास आणून दिले की, रात्रीच्या वेळी विजेचा दाब सतत कमी-अधिक होत असून अनेक वेळा वीजपुरवठा अचानक बंद होत आहे.

या परिस्थितीमुळे घरातील दूरदर्शन, फ्रीज, पंखे, इन्व्हर्टर आणि इतर विद्युत उपकरणांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम होत असून नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

सर्वाधिक चिंतेचा विषय म्हणजे ज्ञानदीप प्राथमिक शाळेच्या परिसरात वाढलेली संशयितांची वर्दळ. महिलांनी सांगितले की, रात्रीच्या वेळी काही अज्ञात व्यक्ती परिसरात फिरत असल्याचे अनेकांनी पाहिले आहे.

त्यामुळे चोरीच्या घटना घडण्याची भीती नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. महिला आणि मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला असून रात्रीच्या वेळी बाहेर पडण्यासही नागरिक घाबरत असल्याचे महिलांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर चंदनझिरा पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी आणि संशयितांवर लक्ष ठेवावे, अशी मागणी करण्यात आली. महिलांनी मांडलेल्या सर्व समस्या ऐकल्यानंतर नगरसेवक अनिल तिरुखे, सुनील बोर्डे, माजेद पठाण आणि दिनेश दैने यांनी संबंधित विभागांशी समन्वय साधून प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले.

पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली जाईल, वीज समस्येबाबत वीज वितरण कंपनीशी संपर्क साधला जाईल तसेच परिसरातील सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाला रात्रीची गस्त वाढविण्याबाबत निवेदन दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. सत्यम नगर परिसरातील महिलांनी यावेळी सांगितले की, मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रश्न प्रलंबित राहत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

या प्रसंगी सत्यम नगर आणि चंदनझिरा परिसरातील महिला, तरुण, ज्येष्ठ नागरिक आणि स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी दिलेली आश्वासने लवकरात लवकर प्रत्यक्षात उतरवावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### प्रशासनाच्या नियोजन...

विविध विकासकामांसाठी करण्यात आलेल्या रस्ते खोदाईमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. अरुंद रस्ते, पर्यायी मार्गांची कमतरता आणि वाहतूक नियंत्रणाचा अभाव यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

शाळा, महाविद्यालये, कार्यालये आणि व्यावसायिक प्रतिष्ठानांकडे जाणाऱ्या नागरिकांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

**वाहतूक पोलिसांची भूमिका प्रश्नचिन्हाखाली**

शहरातील वाढती वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांची यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत दिसत नसल्याची टीका भास्करराव अंबेकर यांनी केली. प्रमुख चौकांमध्ये वाहतूक नियंत्रित करण्यासाठी पुरेशी मनुष्यबळ व्यवस्था नसल्यामुळे कोंडी अधिक वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

**नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न**

अनेक ठिकाणी नाल्यांवरील ढापे तुटलेल्या अवस्थेत पडून आहेत. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही परिस्थिती नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक ठरत असून अपघाताची शक्यता वाढली आहे. विशेषतः दुचाकीस्वार, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना याचा मोठा फटका बसत आहे.

**तातडीने उपाययोजना करण्याची मागणी**

शहरातील वाहतूक कोंडीमुळे सर्वसामान्य नागरिकांना होत असलेला मनस्ताप दूर करण्यासाठी प्रशासनाने तात्काळ वाहतूक नियोजन करावे, पर्यायी मार्ग निश्चित करावेत, वाहतूक पोलिसांची संख्या वाढवावी आणि सुरू असलेल्या विकासकामांचा समन्वय साधावा, अशी मागणी माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केली आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या या गंभीर समस्येकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा जालनाकर नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

### नशेच्या 'बटन...

सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगेवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मोराती शिवरकर, पोलीस हेडकॉन्स्टेबल विनोद गडधे, कैलास कुरेवाड, महेंद्र सोनवणे, दीपक बडुरे तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाचे जीवन जाधव यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली.

**शहरातील नशेच्या जाळ्यावर पोलिसांचा फोकस**

जालना शहरात तरुणांमध्ये नशेसाठी औषधांचा गैरवापर वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. वैद्यकीय कारणांशिवाय अशा औषधांची अवैध विक्री होत असल्यास ती सार्वजनिक आरोग्यासाठी गंभीर बाब मानली जाते. या कारवाईमुळे अशा प्रकारच्या अवैध औषध विक्रेत्यांवर पोलिसांचा दबाव वाढणार असून आगामी काळात आणखी कारवाया होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### प्रभाग क्रमांक १६...

संपर्क साधून पालकांना जागरूक करण्याच्या उपक्रमामुळे अनेक बालकांपर्यंत पोलिओ लस पोहोचली असल्याचे नागरिकांनी सांगितले.

राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेच्या माध्यमातून बालकांना पोलिओसारख्या गंभीर आजारापासून संरक्षण देण्याचे महत्त्व अधोरेखित झाले असून प्रभाग क्रमांक १६ मध्ये लोकप्रतिनिधी, आरोग्य विभाग आणि नागरिक यांच्या समन्वयामुळे ही मोहीम यशस्वी ठरल्याचे चित्र दिसून आले.

### परतूर येथे लाल ...

राहून मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी प्रत्येक बालकाची नोंद करून सुरक्षित व नियोजनबद्ध पद्धतीने लसीकरण केले. तसेच लसीकरणाबाबत जनजागृती करून पुढील आरोग्य सेवांविषयीही माहिती देण्यात आली.

या उपक्रमासाठी विद्यालय प्रशासन, शिक्षक, आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका तसेच पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नातून पल्स पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वीरीत्या पार पडली.

### आरक्षित तिकीट...

करतो. रेल्वेने आपली जबाबदारी ओळखून प्रवाशांना चांगली सेवा द्यावी, अन्यथा त्यांनाही अशाच दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल.''

आयोगाने आपल्या निकालात स्पष्ट केले की, प्रवाशांनी संपूर्ण प्रवास पूर्ण केल्यामुळे तिकीटाची रक्कम परत केली जाणार नाही. तथापि, रेल्वेच्या निष्काळजीपणामुळे तक्रारदारांना जो मानसिक आणि शारीरिक त्रास झाला, त्याची भरपाई करणे आवश्यक आहे. त्यानुसार, आयोगाने प्रतिवादी क्रमांक १ ते ४, म्हणजेच भारतीय रेल्वे मंत्रालय आणि संबंधित अधिकाऱ्यांना, आदेशाच्या ४५ दिवसांच्या आत एकूण ७५,००० रुपयांची रक्कम तक्रारदारांना देण्याचे निर्देश दिले आहेत.

### जाफ्राबाद तालुक्यात...

शेतकरी संतोष औटी यांनी सांगितले की, नदी-नाले कोरडे पडून जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला होता. मात्र या पावसाने शेतीला जीवदान मिळाले

असून गावातील विहिरींची पाणी पातळी वाढण्यास मदत होईल व यंदा विक्रमी उत्पन्न मिळेल. महिला शेतकरी सुनिता अंभोरे म्हणाल्या की, गेल्या वर्षी पाऊस लांबल्याने दुबार पेरणीचे संकट आले होते. यंदा वेळेवर पाऊस आल्याने बियाणे आणि खत घेऊन शेतात उतरलो असून मुलाबाळांसाठी दोन घास सुखाचे मिळतील. तर शेतकरी फकिरबा सोनसाळे हे सर्जे राजाला तिफनावरील चाड्यावर मूठ धरून गाणे गात पेरणी करत असल्याचे उत्साहवर्धक चित्र शिवारात पाहायला मिळाला.

### स्वातंत्र्याच्या ७९...

ही खेदाची बाब आहे.

**अमोल देशमुख एक शेतकरी.**

रस्त्याने रुग्णालयात न्यावे लागते. अशावेळी शाळकरी मुलांसह रुग्ण, शेतकरी व सामान्य जनतेला पावसाळ्यात चिखल तुडवत हा रस्ता पार करावा लागतो. वेळोवेळी मागणी करूनही आतापर्यंत या पानंद रस्त्याचे काम न झाल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

आता तरी प्रशासनाने प्राधान्य क्रमाने या पानंद रस्त्याचे कामहाती घ्यावे, अशी मागणी शेतकरी सर्जेराव देशमुख, गबजी जाधव, दत्तात्रय जाधव, शंकर भागवत, दत्ता सुरडकर, विठ्ठल उखर्डे, गजानन उखर्डे, राजधर उखर्डे, प्रभू वाघमारे, सचिन सपकाळ, शंकर उखडें, सारंग उखर्डे, नजीरखा पठाण, मख्खनखा पठाण, आनंद उखर्डे, शालिग्राम धनवई, भानदास धनवई, सचिन मुकुटराव, काशिनाथ सपकाळ,

राजधर उखर्डे, निखिल देशमुख, मंजीराम बोराडे, भागाजी पाचे, लहू माघाडे, हरी सोनसाळे, भगवान सोनसाळे, बाबू कावळे, गणपत भागवत, संतोष बोराडे, सुभाष कळंबे, नारायण उखर्डे, गणेश भागवत, सांडू उखर्डे, ठकसेन उखर्डे, विजय उखर्डे, मनोहर भागवत, दिगंबर भागवत, दगडुबा काठोळे, रामदास धनवई, माधव डोमाळे, भानुदास मघाडे, विनोद उखर्डे, विठ्ठल पाचे, सोनाजी उखर्डे, रामू उखर्डे, विक्रम उखर्डे, अशोक उखर्डे, भगवान कावळे, गणेश कावळे, समाधान कावळे, विष्णू कावळे, अमोल देशमुख, संतोष बोराडे, भाऊसाहेब बोराडे, बाळू माघाडे, विनायक ढवळे यांच्यासह परिसरातील इतर शेतकऱ्यांनी केली आहे.

# विचारांना दिशा देणारे शब्दविश्व : 'विचार मंथन'

''शब्द हे केवळ अक्षरांचे समूह नसतात; ते समाजपरिवर्तनाची ठिणगी असतात.'' याच भावनेची प्रचिती देणारा सुरेश श्रीनिवासजी मंत्री यांचा विचार मंथन हा लेखसंग्रह वाचकाला केवळ विचार करायला भाग पाडत नाही, तर स्वतःच्या जगण्याचा वेध घ्यायलाही प्रवृत्त करतो. सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरणीय, वैज्ञानिक, स्त्री-सक्षमीकरण, बालहक्क, तंत्रज्ञान, मानसिक आरोग्य अशा असंख्य विषयांना स्पर्श करणारे हे पुस्तक म्हणजे संवेदनशील मनाने समाजाकडे पाहण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. पुस्तकातील लेखांचे वैविध्य आणि त्यामागील सामाजिक बांधिलकी यामुळे हा संग्रह केवळ लेखांचा संच न राहता काळाच्या प्रश्नांवर प्रकाश टाकणारा दस्तऐवज ठरतो. लेखक मूळचे विज्ञान शिक्षक असल्यामुळे प्रत्येक विषयाकडे त्यांची पाहण्याची दृष्टी वैज्ञानिक, अभ्यासपूर्ण आणि तर्कशुद्ध आहे. मात्र या वैज्ञानिक दृष्टिकोनाला माणुसकीची ऊब लाभल्याने लेख कोरडे वाटत नाहीत; उलट प्रत्येक शब्दातून समाजाविषयीची तळमळ जाणवते. लोक काय म्हणतील? या लेखातून व्यक्तिमत्त्व विकासाचा संदेश दिला जातो, तर जीवघेणी सेल्फी, मोबाईलचे युग आणि इंटरनेटच्या बाहेरसुद्धा जीवन आहे या लेखांतून आधुनिक तंत्रज्ञानाच्या दुष्परिणामांवर प्रभावी भाष्य केले आहे.




या पुस्तकातील सर्वाधिक हृदयस्पर्शी लेख म्हणजे नकोशी. मुलगी म्हणून जन्माला आलेल्या बालिकेच्या अस्तित्वाचा प्रश्न लेखकाने इतक्या संवेदनशीलतेने मांडला आहे की, त्या लेखामुळे प्रत्यक्ष त्या विद्यार्थिनीचे नाव बदलण्याची प्रक्रिया घडून आली. साहित्याची खरी ताकद काय असते, याचे हे जिवंत उदाहरण आहे. लेखकासाठी लेखन ही केवळ अभिव्यक्ती नसून समाजबदलाचे प्रभावी माध्यम आहे, याची साक्ष हे पुस्तक देते.

''जिथे माणुसकीचा श्वास जिवंत असतो,
तिथे शब्दही परिवर्तनाची मशाल बनतात.''

बालमजुरी, हरवत चाललेले बालपण, शिक्षणव्यवस्था, स्त्रियांचे मानसिक आरोग्य, पर्यावरण, हवामान बदल, आत्महत्या, सैनिकांचे मानसिक प्रश्न अशा अनेक ज्वलंत विषयांवर लेखकाने आकडेवारी, संदर्भ आणि अनुभव यांच्या आधारे मांडणी केली आहे. त्यामुळे प्रत्येक लेख वाचकाला विचार करण्यास भाग पाडतो. लेखक समस्येचे केवळ चित्रण करत नाही; तर त्यावर उपायांचाही शोध घेतो. हीच या पुस्तकाची सर्वात मोठी जमेची बाजू आहे. भाषेच्या दृष्टीनेही विचार मंथन विशेष उल्लेखनीय आहे.

भाषा सहज, प्रवाही आणि सर्वसामान्य वाचकाला समजणारी आहे. गरजेनुसार भावनिक, अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी शैलीचा सुंदर मेळ लेखकाने साधला आहे. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक, सामाजिक कार्यकर्ते तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या युवकांसाठीही हे पुस्तक उपयुक्त ठरते. या पुस्तकात व्यक्तिचित्रणालाही महत्त्वाचे स्थान आहे.

सिंधुताई सपकाळ, अण्णाभाऊ साठे, राजर्षी शाहू महाराज, दिलीप कुमार, नीरज चोप्रा, मीराबाई चानू अशा विविध क्षेत्रांतील व्यक्तिमत्त्वांचा परिचय करून देताना लेखक त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी मागोवा घेतो. त्यामुळे पुस्तकात वैचारिकतेसोबत प्रेरणेचाही झरा अखंड वाहताना दिसतो.

''विचारांची ज्योत जेव्हा शब्दांत उजळते,
तेव्हाच समाजाच्या वाटा प्रकाशमान होतात.''

आज माहितीचा स्फोट झालेल्या काळात योग्य विचारांची नितांत गरज आहे. अशा वेळी विचार मंथन हे पुस्तक वाचकाला थांबून स्वतःकडे आणि समाजाकडे नव्या नजरेने पाहायला शिकवते. लेखकाने कोणताही अभिनिवेश न बाळगता वस्तुस्थिती मांडली आहे. त्यामुळे हे पुस्तक उपदेशात्मक न वाटता संवाद साधणारे वाटते.

एकंदरीत, विचार मंथन हा लेखसंग्रह समाजातील विविध प्रश्नांवर भाष्य करताना वाचकाच्या मनात संवेदनशीलतेची बीजे पेरतो. विचारांना चालना देणारे, कृतीची प्रेरणा देणारे आणि माणुसकीवरील विश्वास दृढ करणारे हे पुस्तक प्रत्येक सुजाण वाचकाच्या ग्रंथसंग्रहात असावे, असेच आहे. समाजजागृती करणारे साहित्य कसे असावे, याचा आदर्श नमुना म्हणून या पुस्तकाकडे निश्चितच पाहता येईल.

**पुस्तक परीक्षण**
**बुद्धभूषण कांबळे (७४९८७१५६६१)**
**मु. पो. खंडाळी, ता. अहमदपूर, जि. लातूर**

# आस्थेच्या ठीकाणी चोरी करणाऱ्यां गुन्हेगारांच्या संपत्तीवर बुलडोझर चालवून कठोर शिक्षा द्यावी

हिंदूंचे आस्थेचे अयोध्येतील भगवान राममंदिर आज जागतिक स्तरावर प्रसिद्ध मंदिर मानल्या जाते आणि अशा ठिकाणी देणगी चोरीचा प्रकार घडने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.या मंदिरात दररोज लाखो भाविक आपली हजेरी लावतात.कारण भगवान राम हे संपूर्ण भारतवर्षाचे आस्थेचे प्रतीक आहे.अशा महत्वपूर्ण मंदिरात प्रत्येक भक्तगण फुल नाही फुलांची पाकळी म्हणून देणगीच्या रूपात देत असतात.अशा प्रकारे राममंदिरात देणगीच्या रूपात दररोज सुमारे २० लाख रूपयांपेक्षा जास्त देणगी जमा होत असते, याव्यतिरिक्त सोने-चांदी सारखे आभुषण देणगीच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात येत असल्याचे सांगितले जाते आणि यात ट्रस्टच्याच लोकांनी चोरांची टोळी तयार करून घृणीत कार्य करून चोरीचे घोर पाप केले आहे.कारण देशातील प्रत्येक भाविकांनी आपल्या आस्थेचे प्रतीक म्हणून राममंदिरात देणगी अर्पण करीत असतो आणि येथीलच लोकांनी व त्यांच्या नातेवाईकांनी देणगीच्या तिजोरीवर हात साफ केला हे घोर पाप कधीच धुतल्या जाणार नाही. कारण दानदाते गोरगरीब, सर्वसामान्य, शेतकरी,श्रीमंत अशा सर्वच स्तरातील भक्तांचा यात समावेश असतो आणि आहे.देणगी चोरीचा प्रकार अंदाजे २०० कोटी रूपयापर्यंत असल्याचे सांगितले जाते.परंतु देणगीच्या तिजोरीवर २०२० पासुनच चोरांची नजर असावी हेही लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे हा आकडा २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त जावू शकतो.कारण यात सोने-चांदीचाही मोठ्या प्रमाणात समावेश आहे.देणगी चोरीमध्ये मोठमोठे दिग्गज सहभागी असु शकतात आणि आहेत त्यांची नावे समोर आणण्यास सरकार हिचकिचावत आहे यालाही नाकारता येत नाही. अयोध्येतील राम मंदिरात भाविकांकडून मिळालेल्या देणगीच्या अपहार प्रकरणात आठ जणांना अटक करण्यात आली आहे यात अविनाश शुक्ला,अनुकल्प मिश्रा,लवकुश मिश्रा,मनीष कुमार यादव,करूनेश पांडे, रामशंकर मिश्रा, सुभाष श्रीवास्तव, रामशंकर यादव, उर्फ टिन्नु या आठ जनांना अटक करण्यात आली आहे व यांना २९ जून पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.परंतु याप्रकरणातील मोठे आरोपी आणि मास्टरमाइंड अजुनही मोकाट फिरत आहेत.यांना सरकार बेड्या का ठोकत नाही?अयोध्येतील राममंदिर देणगी घोटाळा मोठ्या प्रमाणात असल्याने आणि आपल्या अंगलट येत असल्याचे पाहून श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र विश्वस्त न्यासाचे सरचिटणीस चंपत राय आणि त्यांचे प्रभावशाली सदस्य डॉ.अनिल मिश्रा यांनी २६ जूनला आपल्या पदाचे राजीनामे दिले.याच्या पदाच्या राजीनाम्यामुळे स्पष्ट होते की देणगी चोरी प्रकरणात या दोघांचे हात अवश्य असुन मोठमोठे दिग्गज यात सहभागी असावे. माझ्या माहितीनुसार रामजन्मभूमी तिर्थक्षेत्र ट्रस्टच्या अध्यक्षांनी चौकशी होईपर्यंत कोणत्याही विश्वस्तांचे किंवा कर्मचाऱ्यांचे राजीनामे स्विकारू नये.कारण हिंदूंनी आपल्या घामाचा एक-एक पैसा दान पेटीत जमा केला आणि त्यावर ट्रस्टच्याच काही लोकांनी हात साफ केला.त्यामुळे संपूर्ण चौकशी होईपर्यंत आणि गुन्हेगारांना शिक्षा होईपर्यंत ट्रस्टचे सदस्य व कर्मचारी राज्याबाहेर किंवा देशाबाहेर जाणार नाही व राजीनामा देणार नाही याकडे केंद्र सरकारने व मुख्यत्वे करून रामजन्मभूमी तिर्थक्षेत्र ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्यगोपाल दास आणि कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज यांनी लक्ष दिले पाहिजे.श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टची निर्मिती उत्तर प्रदेश सरकारने केलेली नाही.त्यामुळे यात उत्तर प्रदेश सरकारने हस्तक्षेप न करता ही चौकशी केंद्राच्या स्वाधीन करावी.सर्वोच्च न्यायालयाच्या अयोध्या निकालाच्या अनुषंगाने फेब्रुवारी २०२० मध्ये ट्रस्टची स्थापना करण्यात आली.त्यामुळे याप्रकरणात उत्तरप्रदेश सरकारने हस्तक्षेप करू नये. चौकशीची संपूर्ण जबाबदारी केंद्र सरकारची आहे.कारण या ट्रस्टची स्थापना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार केंद्र सरकारने फेब्रुवारी २०२० मध्ये केली.या ट्रस्टचे अध्यक्ष महंत नत्यागोपाल दास आहेत, कोषाध्यक्ष स्वामी गोविंद देव गिरी महाराज,सरचिटणीस (जनरल सेक्रेटरी) चंपत राय आणि त्यांचे प्रभावशाली सदस्य डॉ.अनिल मिश्रा आहेत.आणि इतर सदस्य अशाप्रकारे १५ विश्वस्तांची (ट्रस्टी)ही कमिटी आहे. त्यामुळे देणगी चोरी प्रकरणात ट्रस्टवर ताशेरे उठत आहेत. कारण २०२० पासून देणगी स्वरुपात येणारा पैसा, सोन्या-चांदीच्या वस्तू चोरी होत असावी असाही संशय भारतीयांच्या मनात निर्माण होतो आहे किंवा प्रश्न उपस्थित होतो.त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या मार्फत ट्रस्टच्या संपूर्ण सदस्यांची व त्यांच्या परिवाराची आणि कर्मचाऱ्यांची चौकशी करून राममंदिराचा पैसा व वस्तू मंदिरापर्यंत आल्या पाहिजेत याची जबाबदारी केंद्र सरकारने स्विकारावी कारण हा घोटाळा २०२६ मध्ये लक्षात आला आहे.परंतु हा घोटाळा २०२० पासून सूरू होता याही गोष्टीला नाकारता येत नाही.२०२० पासून जर हा घोटाळा सुरू असेल तर देणगी चोरीच्या आकड्यात आश्चर्य कारक भर पडून २००० कोटी रुपयांपेक्षा जास्त सुद्धा जाऊ शकतो.कारण आस्थेच्या ठिकाणी झालेली चोरी साधुसंतांच्या प्रतिमेला मलीन करू शकते.त्यामुळे निश्पक्ष चौकशी करून गुन्हेगारांना कठोर शिक्षा ठोठावली पाहिजे.कारण मंदिराच्या उभारणीसाठी आलेल्या देणग्या आणि दानपेटीतील रकमेचे व्यवस्थापन व देखरेख या ट्रस्टद्वारे केली जाते.त्यामुळे चोरीचा ठीकरा ट्रस्टवर आहे व चोरीचे प्रथम गुन्हेगार ट्रस्ट आहेत त्यानंतर त्यांचे नातेवाईक व कर्मचारी.कारण ही देणगीची चोरी आहे त्यामुळे हे मोठे रॅकेट राहु शकते.रामजन्मभुमी ट्रस्टवर सरकारी नियंत्रण पुर्वीपासून रहाले असते तर चोरी प्रकार टळला असता.परंतु देणगी चोरीच्या प्रकरणात ट्रस्टच्या विश्वस्तांनी व तेथील कर्मचाऱ्यांनी साठगाठ करून दाणाचा पैसा आभूषणे लुटल्याचे स्पष्ट होते.त्यामुळे याप्रकरणातील एकही चोर सुटणार नाही याची खबरदारी राज्य व केंद्र सरकारने घ्यावी व यात कोणत्याही प्रकारचे राजकारण होणार नाही हेही लक्षात ठेवले पाहिजे.त्याचप्रमाणे गुन्हेगारांच्या संपत्तीवर ताबडतोब बुलडोझर चालवून त्यांना कठोर शिक्षा द्यायला हवी.जय श्रीराम!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# आपण ना खाऊंगा, ना खाने दूंगा मी भ्रष्टाचार करणार नाही आणि कोणाला करूही देणार नाही ही घोषणा

ही केवळ एक राजकीय घोषणा नसून, ती सुशासनाची आणि पारदर्शकतेची एक महत्त्वाची त्रिसूत्री आहे. आपण २०१४ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान आणि त्यानंतरच्या काळात हा नारा देऊन देशातील भ्रष्टाचाराविरुद्धच्या लढ्याला एक नवी दिशा दिली.

भ्रष्टाचार ही आपल्या देशाची जुनी आणि सर्वात मोठी समस्या राहिली आहे. शासकीय कार्यालयातील छोट्या कामांपासून ते मोठ्या सरकारी करारांपर्यंत भ्रष्टाचाराची पाळेमुळे खोलवर रुजलेली पाहायला मिळतात. या पार्श्वभूमीवर ''ना खाऊंगा, ना खाने दूंगा'' हा विचार देशाच्या राजकीय आणि सामाजिक पटलावर अत्यंत प्रभावी ठरला आहे.याचा अर्थ व्यवस्थेच्या सर्वोच्च स्थानी बसलेली व्यक्ती स्वतः पूर्णपणे प्रामाणिक राहील आणि भ्रष्टाचारापासून दूर राहील. जेव्हा देशाचा नेता स्वतः निष्कलंक असतो, तेव्हा संपूर्ण प्रशासनाला एक सकारात्मक संदेश जातो.

ना खाने दूंगा मी कोणाला लाच घेऊ देणार नाही

याचा अर्थ केवळ स्वतः प्रामाणिक राहून चालणार नाही, तर हाताखालील अधिकारी, मंत्री किंवा इतर कोणत्याही घटकाला भ्रष्टाचार करण्याची सूट दिली जाणार नाही. यासाठी कडक कायदे आणि पारदर्शक यंत्रणा उभारणे गरजेचे आहे.

आपल्याला भ्रष्टाचार मुक्त भारत बनवायचा आहे हे आपले स्वप्न आहे. त्यामुळे आपण आपली भूमिका जाहीर केली आहे ''ना खाऊंगा ना खाने दूंगा''. अर्थात भ्रष्टाचार करणार नाही आणि करुही देणार नाही. परंतु-ना खाने दूंगा... म्हणजे भ्रष्टाचार करू देणार नाही हा भाग मात्र जवळपास जैसे थे आहे. आज आपण जर वर्तमानपत्र उघडले तर पानोपानी भ्रष्टाचाराच्या बातम्या वाचायला मिळतात. अर्थातच हा भ्रष्टाचार अनेक प्रकारांचा असतो तो अगदी खाली तलाठ्यापासून तर उच्च प्रशासकीय अधिकाऱ्यापर्यंत असतो, आमदार, खासदार, राजकीय पदाधिकारी, आता त्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद हे सर्व कार्यालय येतात. कितीही म्हटले तरी तो यामधील भ्रष्टाचार अद्याप पर्यंत थोपवता आलेला नाही. त्याचीही अनेक कारणे आहेत.

आपल्या मनात जरी भ्रष्टाचार मुक्त भारत ही संकल्पना असली तरीपण आज आपण बघत आहोत, तसे वातावरण नाही. ज्या त्या क्षेत्रात भ्रष्टाचार माजलेला आहे. अगदी गाव पातळीपासून भ्रष्टाचाराची मूळ आहेत आणि वरती तर मग त्याचा वृक्ष झालेला आहे .आज मितीला जर बघितले तर सहकार खाते, सार्वजनिक बांधकाम, परिवहन, अन्न नागरी पुरवठा,अन्न औषध प्रशासन, महसूल, कृषी, गृह, उर्जा, वन, ग्राम विकास, आदिवासी विकास, ग्राहक विभाग , शिक्षण विभाग,सर्व खाते भ्रष्टाचाराचे कुरणे आहेत.



अन्न औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे ज्या धडाडीने भेसळखोरी व त्यातील भ्रष्टाचार गुटका विक्री विषयी जी मोहीम राबवत आहेत अशाच प्रकारे सर्वच खात्यामध्ये मोहीम राबविणे आवश्यक आहे. म्हणजेच अशा अधिकाऱ्यांमध्ये तशीच मानसिकता तयार करणे आवश्यक आहे.

आपण कठोर पावले उचलण्याचा निर्धार




केलेला आहे.तर त्या दृष्टीने विचार करुन अधिकाऱ्यांच्या नेमणुका करून त्यांना स्पष्ट निर्देश देणे आवश्यक आहे.

अनेक विकासाच्या योजना राबविण्यात येतात.अनेक योजनेत सर्वसामान्य शेतकऱ्यांना लाभ मिळतच नाही. ठराविक लोकांना लाभ मिळतो. त्यात मोठे प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. तो थोपवण्याचे आव्हान आहे.( पंचायत समितीच्या पातळीवरील योजना.)

अगदी सातबारा उताऱ्यावरील पक्की नोंद करण्यासाठी पैशाची मागणी केली जाते, शेतात वीज कनेक्शन घेताना पैशाची मागणी केली जाते, जिल्हा परिषद मधून शिक्षण विभागातून पगार काढण्यासाठी पैशाची मागणी केली जाते,मुलांना शाळेत प्रवेशासाठी डोनेशन ची मागणी होते. वनविभागात वृक्ष लागवडीमध्ये भ्रष्टाचार होतो, सरकारी धान्य गोडाऊन मधून माल बाहेर विकला जातो. शेतकऱ्याला शेडनेट मंजुरीसाठी पैसे द्यावे लागतात, तसेच बऱ्याच वेळा निरनिराळे कर्ज मंजुरीसाठी पैसे द्यावे लागतात.

मंत्रालयापासून जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालयापर्यंत कुठेही सर्वसामान्य माणसाचे काम सहजरीत्या होत नाहीत. ही साखळी अनेक वर्षांपासून तशीच आहे. लाखाच्यावर पगार असणाऱ्या शासकीय सेवेतील कर्मचारी लाच घेताना कचरत नाही आणि त्यांनाही काही वाटत नाही. लाखाच्या वर पगार घेणारा कर्मचारी सर्व सामान्य शेतकऱ्याकडून सुद्धा पैशाची मागणी करतो,आणि घेतो, ही अतिशय शरमेची गोष्ट आहे. या सगळ्या गोष्टींना कुठेतरी लगाम घालणे आवश्यक आहे. भूमी अभिलेख कार्यालयात अनेक दलालांचा वावर असतो. नाव लावण्यासाठी या ठिकाणी दर ठरलेले आहेत आणि यातील वाटा साहेबांना द्यावा लागतो असे सांगून दलाला कडून सर्वसामान्यांची लूट करण्यात येते. एन.ए. प्रस्ताव मंजूर करण्यासाठी लाच मागीतली जाते. तहसीलदार महसूल सहाय्यक, तलाठी आणि खाजगी व्यक्ती असा गुन्हा दाखल होतो.

**आपला स्नेही.**
**हितचिंतक.**
**भारतीय नागरिक.**

# जालना जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक यांची टेंभुर्णी पोलीस स्टेशनला भेट

## तक्रार निवारण दिना निमित्त १९ प्रकरण निकाली

**दत्ता देशमुख**

तक्रार निवारण दिना निमित्त जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री तेघबीर सिंह संधू यांनी टेंभुर्णी पोलीस स्टेशन ला भेट देऊन या वेळी आलेल्या १९ तक्रार पैकी सगळ्या १९ तक्रारी निकाली काढून येथील पोलीस स्टेशन बाबत माहिती घेऊन योग्य सूचना दिल्या.या वेळी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री अविनाश राठोड यांच्या सह स पो उप निरीक्षक बाबासाहेब खार्डे यांच्या सह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. या वेळी नव्याने आलेले श्री तेगबीर सिंग संधू यांची व्यापारी महासंघाचे अध्यक्ष अलकेश सोमाणी व पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री शेख साबेर सर फकरू कुरेशी आणि संजय बोडखे यांनी या वेळी त्यांचे भेट घेत त्यांचे शाल पेन भेट




देऊन स्वागत केले आणि त्यांच्या जबरदस्त कामाचे कौतुक केले.

# प्रभाग क्रमांक १६ मध्ये राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेला उत्साहात प्रारंभ; शिवसेनेच्या नगरसेवकांचा पुढाकार

## जनजागृती, नियोजन आणि घराघरांत संपर्कामुळे जवळपास शंभर टक्के बालकांना पोलिओ डोस; नागरिकांकडून उपक्रमाचे स्वागत

**जालना । प्रतिनिधी**

राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत जालना शहरातील प्रभाग क्रमांक १६ मध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात आली. ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक पोलिओच्या लसीपासून वंचित राहू नये, या उद्देशाने शिवसेनेचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेच्या नगरसेविका दर्शनाताई खोतकर-झोल तसेच नगरसेवक अमोल ठाकूर, किशोर पांगाकर आणि निखिल पगारे यांनी विशेष पुढाकार घेतला.

भागोदय नगर, यशवंत नगर, म्हाडा कॉलनी तसेच प्रभागातील इतर सर्व परिसरात पल्स पोलिओ मोहिम प्रभावीपणे राबविण्यात आली. आरोग्य विभागाच्या सहकार्याने विविध ठिकाणी पोलिओ बूथ उभारण्यात आले होते. या मोहिमेत नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

**घराघरांत जनजागृती; पालकांशी थेट संवाद**

मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी चारही नगरसेवकांनी गेल्या दोन दिवसांपासून नागरिकांशी सातत्याने संपर्क साधला. दूरध्वनीद्वारे तसेच प्रत्यक्ष भेटी घेऊन पालकांना आपल्या बालकांना



पोलिओचे दोन थेंब पाजण्याचे आवाहन करण्यात आले.

''दोन थेंब जीवनाचे'' हा संदेश प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली. विशेषतः ज्या भागांमध्ये बालकांची संख्या अधिक आहे, त्या भागांमध्ये विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

**विविध पोलिओ बूथना भेटी**

मोहिमेदरम्यान नगरसेविका दर्शनाताई खोतकर-झोल तसेच नगरसेवक अमोल ठाकूर, किशोर पांगाकर आणि निखिल पगारे यांनी विविध पोलिओ बूथना भेटी देऊन कामाचा आढावा घेतला. त्यांनी आरोग्य विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून लसीकरण मोहिमेच्या अंमलबजावणीची माहिती घेतली. यावेळी आरोग्य कर्मचाऱ्यांनी देखील नागरिकांना पोलिओ लसीकरणाचे महत्त्व समजावून सांगत बालकांना वेळेत डोस देण्याचे आवाहन केले.

**जवळपास शंभर टक्के लसीकरण**

सातत्यपूर्ण जनजागृती, योग्य नियोजन आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे प्रभाग क्रमांक १६ मध्ये जवळपास शंभर टक्के बालकांना पल्स पोलिओचे डोस देण्यात आल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले. आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनीही या मोहिमेत लोकप्रतिनिधींनी दिलेल्या सहकार्याचे कौतुक केले असून नागरिकांच्या सहभागामुळे मोहिमेला मोठे यश मिळाल्याचे सांगितले.

**नागरिकांकडून कौतुक**

प्रभागातील नागरिकांनी शिवसेनेच्या चारही नगरसेवकांनी घेतलेल्या पुढाकाराचे स्वागत केले आहे. घराघरांत *(पान २ वर)*



जिल्हा सामान्य रुग्णालयात आज रोजी जागतिक पल्स पोलिओ दिनानिमित्त शून्य ते पाच वर्षाच्या बालकांना पल्स पोलिओ देताना आमदार अर्जुन खोतकर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ पाटील प्राचार्य डॉ कडले भुसारे मैडम वैधकिय अधीक्षक डॉ गवारे डॉ कुलकर्णी औषध निर्माण अधिकारी शाहनवाझ अहेमद स्मिता भाले सिस्टर सविता फडेलवाल. भोसले महेंद्र वाघमारे दिपाली सोबत इतर कर्मचारी हजर होते. ***छायाचित्र किरण खानापुरे***

# परतूर येथे लाल बहादूर शास्त्री विद्यालयात बालकांना पल्स पोलिओचे डोस

**परतूर - प्रतिनिधी**

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत रविवारी परतूर शहरातील लाल बहादूर शास्त्री विद्यालयात पाच वर्षांखालील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून लसीकरण करण्यात आले. बालकांना पोलिओसारख्या गंभीर आजारापासून संरक्षण मिळावे आणि देशाचा पोलिओमुक्त दर्जा कायम राहावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



या प्रसंगी डॉ. उनवणे यांनी उपस्थित राहून लसीकरण मोहिमेचा आढावा घेतला तसेच बालकांना पोलिओचे डोस पाजण्यात आले. त्यांनी पालकांशी संवाद साधत, ''पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पल्स पोलिओचे दोन थेंब देणे अत्यंत आवश्यक आहे. कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी पालकांनी आरोग्य विभागाला सहकार्य करावे,'' असे आवाहन केले.

लसीकरण केंद्रावर सकाळपासूनच पालकांनी आपल्या चिमुकल्यांसह उपस्थित *(पान २ वर)*

# आरक्षित तिकीट असूनही नरकयातना, रेल्वेला ग्राहक मंचाचा दणका; प्रवाशांना ७५ हजारांची भरपाई!

**जालना - प्रतिनिधी**

पालक्काड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने भारतीय रेल्वेच्या गलथान कारभाराला चपराक लावणारा एक महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. आरक्षित डब्यात अनधिकृत प्रवाशांच्या गर्दीमुळे झालेल्या त्रासाबद्दल रेल्वेला सेवेतील त्रुटीसाठी जबाबदार धरत, तक्रारदार कुटुंबाला ५०,००० रुपये नुकसान भरपाई आणि २५,००० रुपये खटल्याचा खर्च देण्याचे आदेश दिले आहेत. या निकालामुळे देशभरातील रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला असून, आपल्या हक्कांसाठी कसे लढावे याचा एक उत्तम आदर्श निर्माण झाला आहे, अशी प्रतिक्रिया नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी दिली. या प्रकरणात, तक्रारदार पार्थसारथी टी. आणि त्यांचे कुटुंबीय (तक्रारदार) यांनी १० डिसेंबर २०२३ रोजी कन्याकुमारी-पुणे एक्सप्रेसने प्रवास करण्यासाठी आरक्षित तिकीट काढले होते. जेव्हा ते रेल्वेत चढले, तेव्हा त्यांच्या आरक्षित जागांवर आधीच विनातिकीट आणि अनधिकृत प्रवाशांनी कब्जा केला होता. संपूर्ण डब्यात प्रचंड गर्दी होती आणि लोक खाली जमिनीवर, बर्थखाली झोपले होते. यामुळे तक्रारदारांना, विशेषतः ज्येष्ठ नागरिक असलेल्या सदस्यांना, प्रचंड शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला. शौचालयात जाणेही कठीण झाले होते.

तक्रारदारांनी या समस्येबद्दल रेल्वेच्या रेल मदद ॲपवर छायाचित्रांसह तक्रार दाखल केली. रेल्वे सुरक्षा दल आणि तिकीट तपासनीस यांना माहिती देऊनही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. रेल्वे प्रशासनाने न्यायालयात दावा केला की त्यांनी तक्रारीनंतर अनधिकृत प्रवाशांना हटवले होते, परंतु ते आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ कोणताही पुरावा, जसे की टीटीई किंवा इतर कर्मचाऱ्यांची साक्ष, सादर करू शकले नाहीत. याउलट, तक्रारदारांनी सादर केलेले फोटो डब्यातील भीषण परिस्थिती स्पष्टपणे दर्शवत होते.

या निकालावर बोलताना ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ''हा निकाल म्हणजे ग्राहक हक्काचा मोठा विजय आहे. रेल्वेचे आरक्षित तिकीट म्हणजे केवळ प्रवासाचा परवाना नाही, तर तो रेल्वेने प्रवाशाला दिलेल्या सुरक्षित आणि आरामदायक प्रवासाच्या सेवेचा करार आहे. आरक्षित डब्यात अनधिकृत प्रवाशांना रोखण्यात अपयशी ठरणे ही रेल्वेची स्पष्टपणे सेवेतील त्रुटी आहे. पालक्काड ग्राहक आयोगाने ग्राहक तक्रार क्रमांक डीसी/५६३/सीसी/५२९/२०२४** मध्ये दिलेला हा निर्णय रेल्वे प्रशासनाच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे.

ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, ''या निकालातून महाराष्ट्र आणि विशेषतः जालना येथील प्रवाशांनी बोध घेतला पाहिजे. अनेकदा अशा घटनांकडे दुर्लक्ष केले जाते, पण या तक्रारदारांप्रमाणे आपणही जागरूक राहिले पाहिजे. प्रवासादरम्यान गैरसोय झाल्यास त्याचे फोटो, व्हिडिओ काढा, रेल मदद ॲपवर किंवा रेल्वेच्या अधिकृत पोर्टलवर लेखी तक्रार करा. हाच पुरावा न्यायालयात तुमची बाजू मजबूत *(पान २ वर)*

# जाफ्राबाद तालुक्यात वरुणराजाचे जोरदार आगमन; पेरणीसाठी शेतकऱ्यांची लगबग

## दोन दिवसांपासून पावसाची हजेरी; खरिपाच्या पेरण्यांना वेग, शेतकरी सुखावला

**दत्ता देशमुख**

जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जाफ्राबाद तालुक्याला वरुणराजाने अखेर दिलासा दिला आहे. गेल्या दोन दिवसांपासून टेंभुर्णी परिसरात जोरदार पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे. अनेक गावांमध्ये बुधवार रात्रीपासून रिपरिप सुरू असून ''काया मातीत मातीत... तीफन चालते...!'' या ओळींप्रमाणे शेतशिवारात बैलजोडीच्या साहाय्याने पेरणीची लगबग सुरू झाली आहे.



हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील तीन ते चार दिवस पाऊस कायम राहणार आहे. त्यामुळे खरिप हंगामातील सोयाबीन, कापूस, तूर, मूग व उडीद या पिकांच्या पेरण्यांना वेग आला आहे. पावसाने हजेरी लावताच टेंभुर्णी व जाफ्राबादच्या बाजारपेठेत बियाणे, खते व औषधांच्या दुकानात शेतकऱ्यांची गर्दी वाढली आहे. ट्रॅक्टर, नांगर व इतर शेती अवजारांच्या दुरुस्तीच्या कामांनाही गती आली आहे. टेंभुर्णी परिसरातील शेतकरी

**कृषी विभागाचे आवाहन**

शेतकऱ्यांनी पेरणी करताना बियाण्यांवर प्रक्रिया करावी, एकरी बियाण्याचे प्रमाण योग्य ठेवावे आणि पावसाचा अंदाज घेऊनच पेरणी करावी. बनावट बियाणे व खते खरेदी करताना काळजी घ्यावी आणि अधिक माहितीसाठी कृषी सहाय्यकांशी संपर्क साधावा, असे आवाहन जाफ्राबाद तालुका कृषी अधिकारी कार्यालयातर्फे विकास जाधव यांनी केले आहे.

_बैलजोडी जुंपून तीफन चालवण्याचे काम सुरू होते. ''पेरणीयोग्य पाऊस झाला की मातीचा वास येतो. तो वास आला की शेतकऱ्याचा जीव भांड्यात पडतो. दोन महिने डोळे लावून बसलो होतो, आता बळीराजा कष्टाला लागला,'' अशी भावनिक प्रतिक्रिया अमोल देशमुख यांनी आमच्या वृत प्रतिनिधीशी बोलताना दिली

टेंभुर्णीचे *(पान २ वर)*

# स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही बळीराजाची वाट बिकटच; पानंद रस्त्यांची कामे रखडल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप

## जुन्या डावरगाव रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य; शाळकरी मुले, रुग्ण आणि शेतकऱ्यांचे हाल

**दत्ता देशमुख**

स्वातंत्र्याची७५ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही ग्रामीण भागातील बळीराजाची शेतवाट अद्याप बिकटच आहे. आजही पानंद रस्त्यांची कामे न झाल्याने शेकडो शेतकऱ्यांना पावसाळ्यात अक्षरशः चिखल तुडवत शेतात जावे लागते. एकीकडे शासन पानंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी विविध योजना जाहीर करत असले, तरी प्रत्यक्षात मात्र या पानंद रस्त्यांची कामे होणार तरी केव्हा, असा आक्रोश शेतकरी करत आहेत. पावसाळ्यात या पानंद रस्त्यांची अतिशय दुरावस्था होत असल्याने शेती करावी तरी कशी, असा प्रश्न टेंभुर्णीसह परिसरातील शेतकऱ्यांना पडला आहे.





टेंभुर्णी येथील जुना डावरगाव रस्ता या पानंद रस्त्यावर तर एकाच पावसात चिखलाची रबडी जमा झाली आहे. वाहनावरून जाणे तर दूरच, मात्र सध्या या रस्त्याने पायी चालणेही अवघड झाले आहे. या रस्त्याच्या पलीकडे कावळे वस्ती म्हणून धनगर समाजाची तीस ते चाळीस घरे वास्तव्यास आहेत. याशिवाय गावातील जवळपास २०० शेतकरी याच वाटेने आपल्या शेतीत ये-जा करत असतात. वस्तीवरील शाळकरी मुलेही याच वाटेने टेंभुर्णी येथे शाळेत येतात. आजारी रुग्णांना देखील याच

**रस्त्यांची दुरवस्था**

टेंभुर्णी येथील जुना डावरगाव रस्ता या पानंद रस्त्यासह आणखी शिंदेवस्ती ते जुना पापळ रस्ता, पोलीस कॉलनी ते जुना काचनेरा रस्ता, जुना गणेशपुर रस्ता, पुंजाराम बाबा वस्ती रस्ता, राजुरपाटी ते डव्हळे शेत रस्ता आदी अनेक रस्त्यांची मोठी दुरावस्था झाली आहे. यामुळे पावसाळ्यात शाळकरी मुलांसह शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, अखेर या सर्व पानंद रस्त्यांचे भाग्य उजळणार तरी केव्हा, असा संतप्त सवाल परिसरातील शेतकरी विचारत आहेत.

**जुना डावरगाव पांदण रस्त्यावर जेवरेखा नदीवर पूल हवा**

टेंभुर्णी ते डावरगाव जुना पांदण रस्ता, दीडशे ते दोनशे शेतकऱ्यांची शेती या रस्त्यावर आहे, तसेच अनेक वस्त्या सुद्धा या रस्त्यांवर आहे. येथील शेतकरी दररोज जाणे न करतात परंतु या रस्त्यावर पूल नाही. जिव रेखा नदी मोठी आहे तिथे पूल असल्याने पावसाळ्यामध्ये येथून रस्ता बंदच असतो. या शेतकऱ्यांची तसेच वस्त्यांवरच्या शाळकरी मुलांची दुरावस्था होते. हा पूल झाला पाहिजे असे अनेक शेतकऱ्यांची मागणी आहे. स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर ७५ वर्षानंतरही इथे पूल नाही *(पान २ वर)*



दोन थेंब प्रत्येक वेळी पोलीवोवर विजय दरवेळी हलदोला ता.बदनापुर येथे पोलीवो लसीकरण मोहीम पार पाडण्यात आली उपस्थित आशाताई पुजा मात्रे व गावकरी पांडुरंग मात्रे हे उपस्थित

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.